# FIRST TERM EXAM - 2023-2024

**STD: X** **TIME: 3 HR**
**SUB: Marathi** **MARKS: 80**

<u>कृतिपात्रिकेसाठी सूचना</u> ः

1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात .
2) आकृत्या पेननेच काढाव्यात .
3) उपायोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना , निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही . तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत .
4) स्वच्छता नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपर्वक लक्ष दयावे .

## विभाग -1 ः गदय

**प्र . 1 अ . <u>खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा</u> .**

**कविता** ः सुश्रुत , ओळखलंस मला ? अरे , मी आहे कविता . आपली तर फार पूर्वीपासून चांगलीच ओळख आहे , नाही का ? तुमच्या पाठयपुस्तकांतल्या सगळया कविता तुम्ही तालासुरांत म्हणता .

**सुश्रुत** ः हो ताई ! मला आठवतंय . 'ही आवडते मज मनापासुनी शाळा' आणि 'श्रावामासी हर्ष मानसी' या माझ्या आवडत्या कविता .

**कविता** ः छान हं . सुश्रुत , माझं रूप छोटंस , आटोपशीर . मोजक्या शब्दांत मोठ्ठा आशय व्यक्त करणं हे माझं वैशिष्ट . यमक , अनुप्रास अशा शब्दालंकारांनी माझं बाहयरूप आणि उपमा, उत्प्रेक्षा , रूपकासारख्या अर्थालंकारांनी माझं अंतरंग सजवून कवी मला अधिक आशयगर्भ करतात .

**सुश्रुत** ः मॅडम नेहमी सांगतात कवितेची शब्दरचना अर्थपूर्ण व चपखल असते . कल्पनांचा सुंदर आविष्कार कवितेत असतो , हे बरोबर ना ?

**कविता** ः अगदी बरोबर ! आणखी काय माहीत आहे सुश्रुत तुला ?

**सुश्रुत** ः ताई , मला असं वाटतं संगीतकारांनी स्वरराज चढवला , की तुझं गाण्यात रूपातर होतं, कारण तुला मी पाठयपुस्तकात वाचतो आणि सीडीमध्ये , चित्रपटात ऐकतोसुद्धा .

**कविता** ः छान निरीक्षण आहे हं तुझ . बरं , मला एक सांग तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का ?

**सुश्रुत** ः हो , करतात ना .

**कविता** ः कोणत्या तारखेला करतात ?

https://www.maharashtrastudy.com

सुश्रुत ः अंऽऽऽऽ , २७ फेब्रुवारीला .

कविता ः अगदी बरोबर . तो कोणाचा जन्मदिवस आहे . माहीत आहे तुला ?


सुश्रुत ः नाही ग .

कविता ः 'नटसम्राट' नाटकाचे लेखक वि. वा.शिरवाडकर म्हणजेच कवीवर्य कुसुमाग्रज यांचा . त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहाला मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला आहे .

सुश्रुत ः खरंच ?


कविता ः कुसुमाग्रजांवरोबरच केशवसुत , वालकवी , वा. भ.बोरकर , वा. सी मर्ढेकर , शांता शेळके , इंदिरा संत सुरेश भट , नामदेव ढसाळ , नारायण सुर्वे अशा अनेक कवींनी मला आपल्या प्रतिभेने सजवले .

कृती - 1) आकृतिबंध पूर्ण करा . (2 marks)





कृती - 2) (1 marks)

i)




ii) (1 marks)




कृती - 3) स्वमत ः

पुस्तकांशी मैत्री करण्याचे फायदे लिहा . (3 marks)

प्र.1 आ. खालील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा ः

अव्दुल एकेकीच्या हातांत वांगडया भरू लागला. त्यांना हव्या तशा त्यांच्या मनपसंत वांगडया भरणं म्हणजे एक दिव्यच पण अव्दुलला ती कला साधली होती. वांगडया भरल्यानंतरचा त्यांच्या चेह-यावरचा आनंद अव्दुलला लाखमोलाचा वाटे. दोन - तीन तास वांगडया भरण्याचा कार्यक्रम सुरू होता. सा-या तपोवनातील

तो एक आनंदाचा आणि चैतन्याचा दिवस! आवाज, गडवड, गोंधळ चेहयावरचा आनंद आणि हे सारे वातावरण निर्माण करणारा चुडीवाला अव्दुल म्हणजे तपोवनातील स्त्रियांना, मुलींना अगदी देवदूतासारखा वाटे. वर्षतून दोनदा, संकांतीला आणि ज्येष्ठ पौर्णिमेला तपोवनातील स्त्रिया आतुरतेने वाट पाहत आणि अव्दुललाही तो आनंद वघून विलक्षण ! समाधान लाभे.

असेच काही दिवस गेले. एक दिवस रघुभैया आला. त्याच्या हाती पोस्टमनने दिलेले पत्र होते.

"अब्दुलमियॉं तपोवन से चिठ्ठी आयी है आपको."


"दिखाव............दिखाव."

"अरे पण चिठ्ठी मराठीतून आहे."

"मग वाचून दाखव नं तूच.

रघुभैयाने चिठ्ठी मोठयाने वाचली. चिठ्ठीतला मजकूर ऐकून अब्दुल आणि शन्नू यांना खूपच आनंद झाला. तपोवनात होणा-या ! संमेलनाच्या प्रसंगी अब्दुलचा खास सत्कार होणार होता आणि त्यासाठी पत्र पाठवून दाजीसाहेबांनी त्याला निमंत्रण दिले होते. दोन दिवसांनीच सत्कार समारंभ होता. कधीही लाभणार नाही असे सत्काराचे भाग्य त्याच्या वाटयाला आले होते. पत्र आल्यापासून तो त्याच आनंदात होता. पुन्हा पुन्हा तो स्वतःच स्वतःला विचारत होता, सत्कार करण्याएवढे मी काय केले आहे तपोवनासाठी ?

कृती - 1) खालील कृती पूर्ण करा. (2 marks)



कृती - 2) <u>चौकटी पूर्ण करा</u>. (1 marks)

i)

[ ] ← बांगडया भरण्याचा कार्यक्रम तपोवनासाठी असा दिवस होता → [ ]

ii) खालील विधान पूर्ण करा (1 marks)

अब्दुलला स्वतःशी प्रश्न ⟶ ..............................................

कृती - 3) <u>स्वमत</u>. (3 marks)

सत्यता पटवून दया - ' अब्दुल एक थोर समाजसेवक'

प्र.1 इ) <u>खालील अपठित उता-याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा</u> :

सगळया मनुष्यजात ही एक आहे आणि सगळया मनुष्यजातीचे स्वातंत्र्य समता व बंधुत्व यांच्या पायाव एक कुटुंब निर्माण करणे हेच मनुष्यत्वाचे ध्येय होय. परमेश्वराने सर्व मानवांना जन्मतःच धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य दिले आहे. सर्वांना ऐहिक जीवनाचा, विश्वातील वस्तूंचा यथेच्छ उपभोग घेण्याचा सारखाच अधिकार आहे. शेतकी, कला - कौशल्य, मजुरी इत्यादी कामे मनुष्यास हीनपणा आणीत नसून त्यांच्यायोगे मनुष्याची थोरवी सिद्ध होते. निसर्गशक्तीचा मनुष्याच्या गरजा भागविण्याकरता उपयोग करणे हा मनुष्याचा मुलभूत अधिकार व कर्तव्य होय. ईश्वराने निमार्ण केलेल्या सृष्टीत प्रयल केल्यास सर्व मनुष्यांस त्याचा स्वर्ग बनवता येईल. या विश्वात जगण्याकरता आणि उपयोगण्याकरता वस्तू उत्पन्न करणे किंवा मिळवणे हे मनुष्याचे पहिले कर्तव्य आहे आणि त्याकरता परस्परांना साहाय्य करणे हा मनुष्याचा श्रेष्ठ धर्म आहे. एवढेच नव्हे तर ही ईश्वराची पूजा आहे.

कृती - 1) <u>खालील कृती पूर्ण करा</u>. (4 marks)

i) सर्व मानवांना परमेश्वराने दिलेले स्वातंत्र्य- [ ]

ii) मनुष्यत्वाचे खरे ध्येय – [ ]

iii) मनुष्याची थोरवी सिद्ध करणारी कामे – [ ]

iv) मनुष्याचा सर्वश्रेष्ठ धर्म – [ ]

https://www.maharashtrastudy.com

## विभाग - 2 ः पद्य ः

प्र.2 अ) खालील कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा ः

फुला फुलांचे दाट ताटवे , जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे , रंग उद्याचे , जपून ठेवू सृष्टी ..................


धान्य देईना संगणक हा , काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती , तयांस देऊ पुष्टी ...............
रंग मजेचे , रंग उदयाचे ..................
उधळून , फेकू बिया डोंगरी , रूजतील देशी झाडे
गच्च माजतील राने , होईल आभाळातून वृष्टी.....................
रंग मजेचे , रंग उद्याचे

डोंगरातून वाहत येते , खळाळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये , राहाल कैसे कष्टी ?
रंग मजेचे , रंग उदयाचे

मिळेल पैसा , मिळेल दौलत , यंत्रांच्या संगती
आभाळाच्या छत्राखाली , एक अनोखी तुष्टी
रंग मजेचे , रंग उदयाचे

हिरवी हिरवी मने भोवती किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी...............
रंग मजेचे , रंग उदयाचे

कृती - 1) कृतीबंध पूर्ण करा **(2 marks)**



कृती - 2) कृती पूर्ण करा. **(2 marks)**

i) 'दौलत' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.
ii) 'कष्ट करणायांना मदत करू' या आशयाची ओळ शोधून लिहा.

कृती - 3) पुढील शब्दांचा अचूक अर्थ लिहा : **(2 marks)**

i) फूल ii) डोंगर iii) मन iv) गोष्ट

कृती - 4) वसुंधरेचे हिरवेपण जपण्यासाठी तुम्हांला माहीत असलेले उपाय सुचवा : **(2 marks)**

**प्र.2 आ) पुढीलपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी त्याखाली दिलेल्या मुद्दयांच्या आधारे कृती सोडवा :**

अंकिला मी दास तुझा किंवा औक्षण https://www.maharashtrastudy.com

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री नाव | 1) | प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री नाव | (1) |
| 2) | कवितेचा विषय | 2) | कवितेचा विषय | (1) |
| 3) | प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश | 3) | प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश | (2) |
| 4) | कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण | 4) | कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण | (2) |
| 5) | खालील शब्दांचे अर्थ लिहा.<br>i) मेघ iii) काज<br>ii) कनवाळू iv) धेनू | 5) | खालील शब्दांचे अर्थ लिहा.<br>i) कष्ट iii) राखण<br>ii) सामर्थ्य iv) दौड | (2) |

## विभाग - 3 : स्थूलवाचन

**प्र.3 पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** **(6 marks)**

1) 'निसर्ग' हा मोठा जादूगर आहे हे विधान वाळवंटी प्रदेशाच्या संदर्भात कसे लागू पडते, ते 'जगणं कॅक्टसचं' या पाठाच्या आधारे सविस्तर लिहा.
2) 'जाता अस्ताला' या कवितेतून सूर्य आणि पणती या प्रतीकांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.
3) 'मोठे होत असलेल्या मुलांनो' या पाठाच्या 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते, ते लिहा.

https://www.maharashtrastudy.com

## विभाग - 4 ः भाषाभ्यास

**प्र.4अ व्याकरण घटकांवर आधारि कृती ः**

**1) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** **(2 marks)**

i. निरंजनची गुरूजीवर अपार श्रद्धा होती .
ii. काय मस्त ॲप तयार केला आहे मी !

**2) कंसांतील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा ः** **(2 marks)**

i. वाळवंटी प्रदेशात हे शक्य नाही (होकारार्थी वाक्य बनवा)
ii. पांढरा रंग कोणाला आवडत नाही? (विधानार्थी करा)

**3) अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा ः** **(कोणतेही दोन)** **(4 marks)**

i. भारावून जाणे.
ii. अंगाचा तिळपापड होणे
iii. झोकून देणे

**आ. भाषिक घटकांवर आधारित कृती करा ः**

1) समानार्थी शब्द लिहा. **(1)**

i. आयुष्य = ii) जंगल =

**2) विरूद्धार्थी शब्द लिहा.** **(1)**

i) प्राचीन X ii) प्रगती X

**3) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **(1)**

i) पायात चप्पल न घालता चालणे –
ii) भाषेचा (नदीसारखा प्रवाह) –

**4) वचन बदला** **(1)**

i) पायवाट – ii) झुडूप –

5) i) <u>अचूक शब्द ओळखून लिहा</u>. (1)

शिष्यवृत्ति / शिष्यवृत्ती / शिप्यवृती / शीप्यवृत्ती

ii) पुढील वाक्य लेखननियमांनुसार लिहा. (1)

सगल्यात भारी ॲप डवक्याच्या कवटीत आहे.

6) i) **खालील वाक्यात योग्य विरामचिन्हाचा वापर करा.** (1)

सुश्रुत म्हणाला वा सर्व ताई – दादांनी मला कित्ती छान माहिती दिली

ii) **विरामचिन्हे ओळखा व लिहा.** (1)

"अन्वर जेवला ?"

## विभाग - 5 ः उपयोजित लेखन

**कृती - 5) <u>खालील कृती सोडवा</u> ः** **(6 marks)**

1) <u>पत्रलेखन</u>

आनंदवन कुष्ठरोग वसाहत, चंद्रपूर, महाराष्ट्र

- कुष्ठरोग्यांची केली जाणारी उत्तम शुश्रुषा उपक्रमावद्दल व्यवस्थापकांना अभिनंदन करणारे पत्र
- शालेय शैक्षणिक सहल निमित्त भेट देण्यावावत विनंती पत्र

**<u>किंवा</u>**

विभाग 1 गद्य विभागातील क 1 (इ) मधील अपाठित उता-याचा एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शव्दांत लिहा ः

**प्र. 5आ) <u>खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा</u> ः** **(10 marks)**

**1) <u>जाहिरात लेखन</u> ः**

पुढील विपयावर आकर्पक जाहिरात तयार करा ः

जेवण पुरवणारी खानावळ

https://www.maharashtrastudy.com

**2) <u>बातमी लेखन</u> :**

खालील माहितीच्या आधारे बातमी तयार करा

आदर्श विद्यालय , अकोला

|| विद्या विनयेन शोभते ||

**" माजी विद्यार्थी मेळावा"**

(सन १९९९ पासूनचे माजी विद्यार्थी)

दि.20 मे 2021
वेळ - सकाळी 11 ते दू. 2

प्रमुख पाहुणेः
श्री. महाजन सर
(मुख्याध्यापक)

**3) <u>कथा लेखन</u> :**

**खालील मुद्दयांवरून गोष्ट लिहा. गोष्टीला योग्य शीर्षक दया व तात्पर्य लिहा.**


**<u>मुद्दे</u> :**

एक कोल्हा ----------- भूक लागते ----------- द्राक्षाची बाग ----------- द्राक्षाची वेल ---- ------- द्राक्षे उंच ----------- उडया मारतो -----------असफल ----------- द्राक्षे आंबट आहेत.

**प्र.5 : <u>लेखन कौशल्य</u> :** **(8 marks)**

**खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा :**

1) <u>प्रसंग लेखन</u> :




https://www.maharashtrastudy.com

**2) फळयाचे आत्मवृत्त**

**मुद्दे :**

परिचय.........जन्म............वालपण.........शाळेत रवानगी आधुनिकतेचा प्रभाव ......परोपकारी वृत्तीमुळे जीवनात समाधानी ............ वर्गात घडणा-या चांगल्या वाईट घटकांचा साक्षीदार ......... प्राचीन रूप काळाची गरज ......... प्राथमिक शाळा .........सेवाभावी वृत्तीमुळे समाधानी .

**3) वैचारिक :**

**पुढील मुद्दे वाचा आणि तुमचे विचार लिहा .**

**मोबाइल आणि आपण**

- मोबाइल हा महत्वाचा शोध
- संपर्क माध्यम
- मजकूर फोटो वेगैरेंची देवाणघेवाण
- मोबाइलद्वारे खरेदी- विकी
- मोबाइल मध्ये कॅमेरा
- मोबाइलचे तोटे टाळणे आवश्यक

**THE – END**

https://www.maharashtrastudy.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10/-
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये पायें,
Paytm or Google Pay से

https://www.maharashtrastudy.com